**कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक सतावणुकीशी संबंधित प्राप्त तक्रार अर्जाची चौकशी करणाऱ्या महिला तक्रार निवारण समितीतील अशासकीय सदस्यांना दैनिक भत्ता देणेबाबत.**

## महाराष्ट्र शासन
## महिला व बाल विकास विभाग
### शासन निर्णय क्रमांकः मकचौ-२०१०/प्र.क्र.४८ /मकक

नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
तारीख: ०७ नोव्हेबर, २०१३.

**वाचा**

1. **शासन निर्णय क्रमांकः सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-१०९९//प्र.क्र./मकअ, दि.१९.०५.१९९९**
2. **शासन निर्णय क्रमांकः मकचौ-२०१०/प्र.क्र.४८/मकक, दि.९.१२.२०१०**
3. **शासन निर्णय क्रमांकः मकचौ-२०१२/प्र.क्र.७/मकक, दि.१९.३.२०१२.**

**प्रस्तावना -**

विशाखा जजमेंट व डॉ.मेधा कोतवाल लेले प्रकरणात मा.सर्वोच्च न्यायालयाने कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळास प्रतिबंध करण्यासाठी सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालयात व इतर संस्थेत महिला तक्रार निवारण समिती गठीत करणे बंधनकारक केले आहे. त्यानुसार सर्व शासकीय / निमशासकीय संस्था, महामंडळ इ. कार्यालयामध्ये महिला तक्रार निवारण समिती स्थापन करण्याचे निदेश दिले आहेत. अशा समितीची अध्यक्षा महिलाच असावी. समितीमध्ये ५०% पेक्षा जास्त महिलांचा समावेश असावा व एका अशासकीय सदस्याचा समावेश असावा अशी तरतूद आहे.

महिला तक्रार निवारण समितीमध्ये अशासकीय सदस्याचे महत्व लक्षात घेऊन दि.९.१२.२०१० व दि.१९.३.२०१२ च्या शासन निर्णयान्वये अशासकीय सदस्यांना दैनिक भत्ता देण्याची तरतूद करण्यात आली होती. उक्त तरतुदीमध्ये बदल करण्याचा प्रस्ताव विचाराधीन होता.

**शासन निर्णय**

शासन निर्णय दि.९.१२.२०१० व दि.१९.३.२०१२ अधिक्रमित करण्यात येत आहेत.

प्रत्येक शासकीय, निमशासकीय महामंडळे, संस्था इ. कार्यालयातील महिला तक्रार निवारण समितीमधील अशासकीय सदस्य समितीच्या बैठकीस उपस्थित राहिल्यानंतर त्यांना जाण्या येण्याचा खर्च म्हणून रु.३००/- प्रमाणे दैनिक भत्ता व प्रवास भत्ता देण्यात यावा. सदरचा खर्च हा त्या त्या विभागाने त्यांच्याकडील कार्यालयीन खर्चातील उपलब्ध अनुदानातून भागवावा.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने अनौपचारिक संदर्भ क्र. १२३/ सेवा-५, दि.७.६.२०१३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३११०८११३४२५४३३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shobha Shivaji Matre

Digitally signed by Shobha Shivaji Matre
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Women & Child Development, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Shobha Shivaji Matre
Date: 2013.11.08 11:34:33 +05'30'

**शो.शि.मत्रे**
अवर सचिव

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
४. सर्व अप्पर मुख्य सचिव// प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.विरोधी पक्षनेता विधानसभा/ विधानपरिषद
६. सर्व मा.संसद सदस्य/ विधानसभा सदस्य/ विधानपरिषद सदस्य
७. मा.मुख्य सचिव यांचे उप सचिव
८. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
९. प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
१०. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
११. पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई/पोलिस महानिरिक्षक
१२. आयुक्त, महिला व बालविकास , पुणे
१३. सर्व विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास विभाग
१४. सदस्य सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई. (पत्राने)
१५. सचिव, निवडणूक आयोग, मुंबई
१६. सर्व जिल्हाधिकारी/ सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१७. सर्व महानगरपालिका आयुक्त.
१८. सर्व जिल्हा महिला बाल विकास अधिकारी
१९. सर्व जिल्हा माहिती अधिकारी
२०. सर्व तहसिलदार.
२१. सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी (तालुकास्तर)
२२. सर्व कार्यासने महिला व बाल विकास विभाग,
२३. निवड नस्ती, मकक